**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५४/२०२१ मधील नि.५ वरील आदेश</u>**

**<u>सौ भाग्यश्री व इतर वि. वायुनंदन व इतर</u>**

<u>CNR NO.MHSN070004862021</u>

प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ अन्वये उत्तरवादी क्र.१ पासुन प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये नउ हजार अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुतचे अर्जदार क्र.१ ने उत्तरवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ अन्वये कलम १८, २० व २२ प्रमाणे वेगवेगळया मागण्यांसाठी अर्ज दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जामध्ये प्रस्तुतचा अर्ज, उत्तरवादी क्र.१ कडुन अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार व उत्तरवादी क्र.१ यांचा विवाह दि. २२.०४.२०१४ रोजी कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकळ, जि.सांगली येथे हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे झालेला आहे. लग्न कार्याचा खर्च दोनही कुटुंबांनी निम्मा निम्मा केलेला आहे.

०३. अर्जदार क्र. १ यांनी कथन केले आहे की, अर्जदार सासरी नांदण्यास गेल्यानंतर सुरवातीचे एक वर्ष तिला व्यवस्थीत नांदविले. त्यानंतर उत्तरवादींनी 'लग्नात जो आम्ही सहा लाख रुपये खर्च केला आहे, ती रक्कम आमची आम्हाला परत दयायला सांग नाहीतर तु माहेरी जावून घेवून ये' असे अर्जदार क्र. १ हिस वारंवार टोमणे मारले. पहिली मुलगी प्रांजल हिचा जन्म होईपर्यंत उत्तरवादी यांनी अर्जदार क्र. १ हिला खूप जास्त शाररिक व मानसिक त्रास दिला. पहिली मुलगी प्रांजल हिच्या जन्मानंतर उत्तरवादी क्र. १, ३ व ४ यांनी अर्जदार क्र. १ हिस मुलगा झाला नाही म्हणून वाईट बोलून, शिवीगाळी करुन मानसिक त्रास दिला. तसेच अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांना अपमानास्पद वागणूक दिली.

०४. अर्जदार क्र. १ यांनी कथन केले आहे की, उत्तरवादीं यांनी अर्जदारांना दि. ११.०३.२०२१ रोजी भांडण करुन मुंबई येथून हाकलून दिले आहे. तेव्हापासून अर्जदार

क्र. १ व ३ हे माहेरी जाखापूर येथेच आहेत. दि. २२.०५.२०२१ रोजी अर्जदार क्र. १ यांच्या वडिलांनी अर्जदार क्र. २ हिला जाखापूर येथे घेवून आलेले आहेत. तेव्हापासून सर्व अर्जदार हे जाखापूर येथेच रहात आहेत. उत्तरवादी यांनी अर्जदारांची खाण्यापिण्याची, औषधपाणी, कपडे, शिक्षण याबाबत कोणत्याही प्रकारची विचारपूस केलेली नाही. तसेच सदरच्या गरजा भागविण्यासाठी कोणत्याही प्रकारे आर्थीक मदत केलेली नाही. अर्जदार हिचे माहेरकडील परिस्थीती गरीबीची असून तिला राहण्यासाठी घर देखील अपूरे पडत आहे. अर्जदार क्र.१ हिच्या वडीलांना मजुरीशिवाय अन्य उत्पनाचे साधन नाही. अर्जदार क्र.१ हिच्या वडिलांचे वय झालेले असून त्यामुळे त्यांना मजुरीची कामे मिळत नाहीत.

०५. अर्जदार क्र. १ यांनी कथन केले आहे की, उत्तरवादी क्र.१ हा शरीराने धडधाकट असून त्याची अर्जदार यांना सांभाळण्याची जबाबदारी होती व आहे. उत्तरवादीं यांची आर्थीक परिस्थीती अत्यंत चांगली असून त्यांची गावी पाच एकर शेती असून त्यामध्ये द्राक्षबाग आहे. त्यापासून त्यांना वार्षीक ३५ ते ४० लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. उत्तरवादी क्र.१ हा सिव्हील अभीयंता असून सध्या मुंबई येथे बांधकाम व्यवसायात काम करतात. त्यापासून त्यांना वार्षीक २० लाख रुपये मिळतात. तसेच उत्तरवादी क्र. १ यांचा नवीन पनवेल येथे पाणी शुध्दीकरण विक्रीचा भागीदारीमध्ये व्यवसाय आहे. त्या व्यवसायापासूनही त्यांना चांगले उत्पन्न मिळते. तसेच उत्तरवादी क्र.२ हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातून सेवानिवृत्त झाले असून त्यांना दरमहा १० ते १५ हजार रुपये इतके निवृत्तीवेतन मिळते. एकंदरीत उत्तरवादींची आर्थीक परिस्थीती अत्यंत चांगली असल्याचे कथन अर्जदार क्र.१ यांनी केले आहे.

०६. अर्जदार क्र. १ यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर चालण्यास बराच कालावधी लागणार आहे. उत्तरवादी यांनी अर्जदार क्र. १ हिस घरातून हाकलून दिल्यापासून कोणत्याही प्रकारे नैतिक जबाबदारी पूर्ण केलेली नाही. अर्जदार क्र.१ हीस स्वतःचा व तिचे मुलांचा सांभाळ करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे दरम्यानच्या काळामध्ये अर्जदार यांना प्रत्येकी रक्कम रुपये नउ हजार पोटगी मिळावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

०७. उत्तरवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचा लेखी जबाब/प्रस्तुत अर्जास उत्तर निशाणी क्र. १० अन्वये दाखल केलेले आहे. उत्तरवादींनी अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केलेले आहे परंतु अर्जदाराने कथन केलेली शारिरिक व मानसिक त्रासाबाबतची सर्व कथने नाकारलेली आहेत. उत्तरवादींनी अर्जदार क्र. १ व उत्तरवादी क्र.१ यांचा विवाह मान्य केलेला आहे.

०८. उत्तरवादी क्र.१ ते ३ यांनी पुढे असे कथन केले आहे की, उत्तरवादी क्र. १ च्या आईवडीलांनी अर्जदार क्र. १ यांच्या पहिल्या मुलीचा सांभाळ केला आहे. उत्तरवादी क्र. २ व ३ हे अर्जदार क्र. १ ची मुलगी प्रांजल हिच्या उज्वल भवितव्यासाठी म्हणून तिच्या नांवे त्यांनी पंतप्रधान सुकन्या योजनेमध्ये महिना पाचशे रुपये जायगव्हाण पोस्टामध्ये भरत आहेत. थोडक्यात उत्तरवादींनी अर्जदार क्र. २ व ३ यांना कधीही दुर्लक्षीत केलेले नाही. उत्तरवादी क्र.१ च्या कथनानुसार अर्जदार क्र. १ हिस स्मार्ट मोबाईल घेवून दिला होता. अर्जदार क्र. १ ही नेहमी फोनवर बोलत असते. अर्जामध्ये मोघम कथने केलेली आहेत. अर्जात नमूद केलेल्या मानसिक व शाररिक त्रासाबाबत अर्जदाराने आजतागायत उत्तरवादींविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली नाही. त्याबाबतचा कोणताही पुरावा अर्जदार क्र. १ यांच्याकडे नाही. मुळात अर्जदार क्र. १ यांनाच उत्तरवादी क्र.१ यांच्याबरोबर संसार करण्याची इच्छा नाही. केवळ पोटगी मिळण्यासाठी व नुकसान भरपाई मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केल्याचे उत्तरवादींनी कथन केले आहे.

०९. उत्तरवादीं यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ हया उत्तरवादी क्र.१ यांना कोणतीही कल्पना न देता मोबाईलवरुन ऑनलाईन महागडया वस्तुंची खरेदी करत होत्या. त्यामुळे उत्तरवादी क्र. १ यास संसार चालविण्यात फार मोठी आर्थीक अडचण येत होती. अर्जदाराने स्वतः उत्तरवादी क्र. १ चा त्याग केलेला आहे व ती तिच्या अंगावरील पाच तोळयाचे दागदागीने, साडया व मुलगी राजनंदीनी हिस घेवून निघून गेली होती. उत्तरवादींनी अर्जदार क्र. १ ने नांदावयास येण्यासाठी मध्यस्थामार्फत भरपूर प्रयत्न केलेले आहेत. परंतु अर्जदार क्र. १ ने कोणतेही कारण नसताना नांदावयास नकार दिलेला आहे.

१०. उत्तरवादीं यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ यांनी उत्तरवादी क्र. १ यांचा स्वतःहून त्याग केलेला आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ यांना कायदयानुसार पोटगी मागता येत नाही. उत्तरवादीं क्र.१ यास कोणताही कामधंदा होत नाही. त्यामुळे त्यांची आर्थीक परिस्थीती पूर्ण खालावलेली आहे. उत्तरवादीं क्र.१ यास कोणतीही शासकीय नोकरी नाही. मुंबईत खाजगी कामधंदा करुन ते जीवन जगत आहेत. उत्तरवादीं क्र. १ यांची अर्जदार क्र. १ ते ३ यांना पोटगी देण्याची ऐपत नाही. उत्तरवादीं क्र.२ यांचे वय ६० असून त्यांना अर्धांगवायू झाला होता व त्यामुळे त्यांची डावी बाजू काम करीत नाही. त्यामुळे त्यांना शेतीतील कोणतेही काम होत नाही. त्यामुळे त्यांनी त्यांची शेती वार्षीक २० हजार रुपये भाडयाने कसण्यास दिलेली आहे. उत्तरवादीं क्र.२ हे एस.टी.महामंडळात नोकरीस होते. त्यावेळी दोन ते अडीच एकर जमीन त्यांनी खरेदी केली होती. सदरची मिळकत ही उत्तरवादीं क्र. २ यांची स्वमिळकत आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ व उत्तरवादीं क्र.१ यांचा त्या जमिनीशी कोणताही संबंध नाही. उत्तरवादीं क्र.२ यांना ३,५७६/- रुपये निवृत्तीवेतन मिळते. सदरच्या निवृत्तीवेतनातून त्यांचा उदरनिर्वाह करणे त्यांना अशक्य झाले आहे.

११. उत्तरवादींनी पुढे असे कथन केले आहे की, उत्तरवादीं क्र.१ हे पनवेल येथे खाजगी कंपनीमध्ये मिळेल त्याठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात कामगार म्हणून मिळेल ते काम करतात. कोरोना काळात कंपन्या बंद झाल्यामुळे त्यांना कोणतेही काम नाही. त्यांचा पाणी शुध्दीकरणाचा कधीही व्यवसाय नव्हता. उत्तरवादीं हे अर्जदार क्र. १ यांचा आजही नांदविण्यास तयार आहेत परंतु अर्जदार क्र. १ यांनी उत्तरवादीं क्र. १ यांचा त्याग केलेला आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस पोटगी मागण्याचा कोणताही अधिकार नाही.

१२. उत्तरवादींनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ हिचे बारावीपर्यंत शिक्षण झालेले असून तिला शिवणकाम व्यवसायाचे उत्तम ज्ञान आहे. अर्जदार क्र. १ हिचा जाखापूर येथे घरी महिलांचा शिवणकामाचा व्यवसाय आहे. त्यातून तिला प्रतिदिन एकहजार ते बाराशे रुपये मिळतात. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही तिचा व इतर अर्जदारांचा सांभाळ करण्यास समर्थ आहे. त्यामुळे अर्जदार हिस उत्तरवादींकडे पोटगी मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. अर्जदार क्र. १ यांच्या तथाकथीत

मतानुसार तिचा झालेला छळ पनवेल, मुंबई येथे झाला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचा व चालविण्याचा अधिकार या न्यायालयास येत नसून तो पनवेल येथील न्यायालयास आहे. त्यामुळे न्यायालयाच्या स्थळसिमेत कोणतेही अर्जास कारण घडले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज प्रस्तुत न्यायालयास चालविण्याचा कोणताही हक्क व अधिकार या न्यायालयास नाही. महिलांच्या घरगुती छळापासून संरक्षण कायदा २००५ मधील असणा-या तरतुदींचा दुरुपयोग करुन सदर कायदयाचा केवळ हत्यार म्हणून वापर केला आहे. वरील सर्व कारणांमुळे अंतरिम पोटगीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी मागणी उत्तरवादींनी केली आहे.

१३. अर्ज, अर्जावरील लेखी जबाब व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षकारांनी सादर केलेल्या कथनांवरुन व युक्तीवादावरुन प्रस्तुतच्या अंतरिम अर्जासाठी खालील विचाराधीन बाबी माझ्या विचारार्थ आल्या आहेत व त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ. क्र.** | **विचाराधीन बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र. १ ही तिच्यावर उत्तरवादींनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी सिध्द करते काय ? | होकारार्थी. |
| २ | अर्जदार स्वतःचा व अर्जदार क्र २ व ३ यांचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम नसल्याचे सिध्द करते काय ? | होकारार्थी. |
| ३ | अर्जदार हे उत्तरवादी क्र.१ यांच्याकडुन मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ४. | आदेश कोणता ? | अंशतः अर्ज मंजुर. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>विचाराधीन बाब क्रमांक १ बाबत</u>** –

१४. उत्तरवादी क्र.१ ने अर्जदारांसोबतचे नाते संबंध मान्य केलेले आहेत. अर्जदार क्र १ ने मूळ अर्जामध्ये तिच्यावरती झालेल्या शारिरिक व मानसिक त्रासाबाबतचे

सविस्तर कथन केलेले आहे. अर्जदारांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जातील कथने सकृतदर्शनी कौटूंबिक हिंसाचार झाला हे दाखवण्यासाठी पुरेशी आहेत. त्यामुळे अर्जदार अंतरिम पोटगीस पात्र आहेत. उलटपक्षी उत्तरवादी क्र. १ ते ३ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदाराने उत्तरवादी क्र. १ याचा स्वतःहुन त्याग केलेला आहे. त्यामुळे अर्जदार ही पोटगीस पात्र नाही. अर्जदातील कथने व अर्जदाराचा युक्तीवाद लक्षात घेता असे दिसून येते की, अर्जदाराने केवळ उत्तरवादीकडून पैसे मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराने पैसे मिळण्यासाठी उत्तरवादी क्र. १ चा स्वतःहून त्याग केलेला आहे. परिणामी उत्तरवादी क्र. १ यास मानसिक त्रास झालेला आहे. सकृदर्शनी कौटूंबिक हिंसाचार झाल्याबाबत सबळ पुरावा नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची त्यांनी विनंती केली.

१५. अर्जाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार क्र. १ हिने प्रत्येक घटनेचे सविस्तर वर्णन मूळ अर्जामध्ये नमुद केलेले आहे. अर्जातील प्रत्येक कथनांचा विचार केला असता प्रथमदर्शनी अर्जदार क्र. १ वर कौटुंबिक हिंसाचार झाला, हे सिध्द होते. यावेळी अर्जदारांच्या कथनांवर संशय निर्माण होण्यास कोणतेही सबळ कारण अभिलेखावर आलेले नाही. उत्तरवादींच्या कथनांप्रमाणे अर्जदाराने खोटी कथने केलेली आहेत. माझ्या मते ही बाब दोन्ही बाजुंचा पुरावा आल्यानंतर बघणे उचित होईल. दोन्ही बाजुंची तोंडी कथने असल्यामुळे कायद्याचे स्वरुप बघता अर्जदाराची कथने खरी असल्याचे प्रथमदर्शनी निर्दशनास येते. अर्जामध्ये अर्जदाराने नमूद केले आहे की, उत्तरवादी तिच्याकडे पैशाची मागणी करीत होते व त्या कारणांवरुन तिला टोमणे मारत होते. तसेच उत्तरवादींनी अर्जदार क्र. १ ला शाररिक व मानसिक त्रास दिलेला आहे. उपरोक्त सर्व कथने प्रथमदर्शनी सिध्द करतात की, अर्जदार क्र.१ हिचा उत्तरवादींनी मानसिक व शारिरिक छळ केलेला आहे व त्याद्वारे कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. अर्जदार क्र.१ ही कोणतेही कारण नसताना स्वतःहून माहेरी रहात असल्याबाबत प्रथमदर्शनी पुरावा आलेला नाही. अर्जदार क्र १ ही सहा वर्षे उत्तरवादीसोबत राहिलेली आहे. अशा परिस्थीतीमध्ये तिने स्वतःहून त्याग करण्याचे कारण प्रथमदर्शनी विश्वासार्ह वाटत नाही. घरगुती हिंसाचाराबाबतच्या कथनांना पुष्टी देणेकामी कागदोपत्रीच पुरावा

आवश्यक असणे कायदयास अभीप्रेत नाही. करीता मी या निष्कर्षापर्यंत येतो की, उत्तरवादींनी अर्जदार क्र. १ ला शाररिक व मानसिक त्रास देवून घरगुती हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. वरील सर्व कारणांवरुन मी विचाराधीन बाब क्र.१ च्या उत्तरार्थ होकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

**<u>विचाराधीन बाब क्र. २ व ३ बाबत -</u>**

१६. वरील दोनही विचाराधीन बाबी हया एकमेकाशी संलग्न असल्यामुळे व आलेला पुरावा लक्षात घेता पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्या एकत्रीत कारणेमिमांसेकरिता घेण्यात येतात.

१७. अर्जदाराने स्पष्टपणे कथन केले आहे की तिला उत्पन्नाचे साधन नाही. तसेच ती कोठेही कामधंदा करु शकत नाही. तिने दाखल केलेल्या सांपत्तीक स्थितीबाबतचे व त्यांच्या उत्पन्नाबाबतच्या शपथपत्रामध्ये (नि.क्र.२३) मध्ये देखील नमूद केले आहे की, तिला उत्पन्नाचे साधन नाही. उत्तरवादी क्र.१ च्या कथनानुसार अर्जदार क्र. १ शिवणकाम करते व शिवणवर्ग घेते परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभीलेखावर नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी असा निष्कर्ष निघतो की, सदरची कथने केवळ अर्जदाराचा हक्क डावलण्यासाठी केलेली आहेत.

१८. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे, उत्तरवादी क्र.१ हा खाजगी नोकरी करतो व त्याचा इतर व्यवसाय देखील आहे. उत्तरवादीच्या उत्पन्नाबाबत व व्यवसायाबाबत ठोस कागदोपत्री पुरावा अभीलेखावर नाही. ही बाब विवादीत नाही. उत्तरवादी क्र. १ ने त्याचे मासिक उत्पन्न सात हजार रुपये नमूद केलेले आहे. परंतु त्याबाबत कोणतेही वेतनप्रमाणपत्र अभीलेखावर दाखल नाही. प्रथमदर्शनी असे दिसून येते की, उत्तरवादी क्र. १ त्यांचे उत्पन्नाचा आकडा लपवू पहात आहे. त्याने नमूद केलेले वेतन किमान वेतना पेक्षा कमी आहे. उत्तरवादींनी त्यांना शेतजमीन असल्याचे मान्य केले आहे परंतु ती शेतजमीन उत्तरवादी क्र. २ ची स्वकष्टार्जित असल्याचे नमूद केले आहे. तसेच उत्तरवादी क्र.२ यांना निवृत्तीवेतन मिळते. त्यामुळे उत्तरवादी क्र. १ वर उर्वरित उत्तरवादी अवलंबून नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

१९. उत्तरवादी क्र. १ हा शरीराने धडधाकट आहे. त्यास खाजगी नोकरीतून

नक्कीच उत्पन्न मिळते. अर्जदारांनी अंतरिम पोटगी प्रत्येकी दरमहा रुपये नउ हजार मिळण्याची मागणी केलेली आहे. परंतु उत्तरवादी क्र. १ चे तेवढे उत्पन्न असल्याबाबत प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. उत्तरवादी क्र. १ ने अर्जदारांच्या पालनपोषणाची जबाबदारी घेतलेली नाही. उत्तरवादी क्र. १ वर त्याच्या आईवडीलांची जबाबदारी असली तरी तो त्याची पत्नी व मुलांची जबाबदारी नाकारु शकत नाही. वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार क्र. १ हीस उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार क्र. २ चे वय ५ वर्षे व अर्जदार क्र. ३ याचे वय ३ वर्षे आहे. अर्जदार क्र. २ व ३ यांच्या पालनपोषणाची बाब देखील अंतरिम पोटगी ठरविताना विचारात घेणे आवश्यक आहे. अंतरिम पोटगीची रक्कम ठरविताना अर्जदारांच्या गरजा, दोन्ही बाजूंचे राहणीमान, उत्तरवादीचे उत्पन्न व त्यावरील असणा-या व्यक्तींची जबाबदारी विचारात घेणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मी या निष्कर्षापर्यंत येतो की, उत्तरवादी क्र.१ ने अर्जदार क्र. १ हिस दरमहा ३,०००/- व अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रुपये २,५००/- अंतरिम पोटगी देण्याचे आदेशित करण्याचे उचित ठरते. करीता विचाराधीन बाब क्र. २ वरील निष्कर्ष मी होकारार्थी व विचाराधीन बाब क्र. ३ वरील निष्कर्ष मी अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन बाब क्र. ४ बाबत**

२०. वर नमुद केल्याप्रमाणे उत्तरवादींनी केलेल्या कौटुंबिक हिंसाचारामुळे अर्जदार क्र. १ हिस वेगळे राहणे भाग पडले आहे. अर्जदार क्र.१ स्वतःचा व उर्वरित अर्जदारांचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम नाही. उत्तरवादी क्र. १ यास उत्पन्नाचे साधन आहे. करीता अर्जदार वर नमूद केल्याप्रमाणे उत्तरवादी क्र. १ कडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. वरील कारणांवरुन अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. करीता विचाराधीन बाब क्रमांक ४ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## <u>आदेश</u>

१. नि.क्र-५ वरील अंतरिम पोटगीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. उत्तरवादी क्र. १ याने अर्जदार क्र.१ हिला प्रतिमहा रक्कम रुपये ३,०००/- (रुपये तीन हजार मात्र) व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रतिमहा प्रत्येकी २,५००/- रुपये (रुपये दोन हजार पाचशे मात्र) अंतरिम पोटगी म्हणून मुळ अर्जाचा निकाल

लागेपावतो अथवा पुढील आदेश होईपावेतो अर्ज दाखल तारखेपासुन द्यावी.

३. सदरच्या आदेशाची प्रत अर्जदार व जाबदार यांना निशुल्क देण्यात यावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2025.01.31 07:37:46 +0530

दिनांक ३०/०१/२०२५. (अरुण र. व्यवहारे )

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग

कवठेमहांकाळ कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 30.01.2025
Order signed by the
Presiding Officer on -30.01.2025
Order uploaded on -31.01.2025